**भारत-बांगलादेश सीमेवर कुंपण उभारणी**

13 जानेवारी 2025

भारतासाठीचे बांगलादेशचे प्रभारी उच्चायुक्त श्री. मोहम्मद नुरुल इस्लाम यांना परराष्ट्र मंत्रालयाने आज 13 जानेवारी 2025 रोजी दुपारी 2:00 वाजता साउथ ब्लॉक येथे बोलावले होते.

2. सीमेवरील सुरक्षा उपाययोजनांबाबत कुंपण उभारणीसहित भारताने दोन्ही सरकारांमधील आणि सीमा सुरक्षा दल आणि सीमा रक्षक बांगलादेश यांच्यातील सर्व प्रोटोकॉल आणि करारांचे पालन केले आहे, असे सांगण्यात आले.

3. सीमापार गुन्हेगारी कारवाया, तस्करी, गुन्हेगारांची हालचाल आणि अपव्यापार या आव्हानांना प्रभावीपणे तोंड देऊन गुन्हेगारीमुक्त सीमा सुनिश्चित करण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा भारताने पुनरुच्चार केला. सीमा सुरक्षित करण्यासाठी काटेरी तारांचे कुंपण, सीमेवर प्रकाशयोजना, तांत्रिक उपकरणे बसवणे आणि गुरांसाठी कुंपण हे उपाय आहेत.

4. भारताने अशी अपेक्षा व्यक्त केली की बांगलादेश पूर्वीच्या सर्व समजुतींची अंमलबजावणी करेल आणि सीमापार गुन्ह्यांचा सामना करण्यासाठी सहकार्याचा दृष्टिकोन बाळगेल.

नवी दिल्ली

13 जानेवारी 2025